आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र – रात्री ८.०५ वाजता

६ ऑक्टोबर २०२३ – शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- येत्या २ वर्षात देशातून नक्षलवाद हद्दपार करण्याचा विश्वास केंद्रीय गृहमंत्र्यांकडून व्यक्त
- राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कुठलाही वाद नसल्याचा शरद पवार गटाचा केंद्रीय निवडणूक आयोगापुढं दावा, पुढची सुनावणी सोमवारी
- सिरीयामध्ये सकाळी सैन्य महाविद्यालयावर झालेल्या ड्रोन हल्ल्यात १०० जणांचा मृत्यू
- यंदाचा नोबेल शांतता पुरस्कार इराणमधल्या मानवाधिकार कार्यकर्त्या नर्गिस मोहम्मदी यांना जाहीर

**आणि**

- आशियाई क्रीडा स्पर्धेत पुरुष हॉकीमध्ये भारतीय संघाला सुवर्ण पदक

**<><><><><>**

येत्या दोन वर्षात देशातून नक्षलवादाचा पूर्ण नायनाट करु, अशी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना केली आहे. नक्षल प्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसोबत नक्षलवादासंदर्भात झालेल्या बैठकीत बोलत होते. गेल्या ४ वर्षात नक्षल प्रभावित क्षेत्राची संख्या कमी होते आहे. या काळात सरकारनं केंद्रीय निमलष्करी दलाच्या १९५ नव्या शिबिरांची स्थापना केली असून आणखी ४४ नवी शिबिरं स्थापन केली जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं. नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मृत झालेल्यांच्या वारसांना मिळणारी रक्कम केंद्र सरकारनं वाढवून ४० लाख रुपये केल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कुठलाही वाद नाही, शरद पवार हेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असल्याचा दावा शरद पवार यांच्या गटानं आज केंद्रीय निवडणूक आयोगासमोर सुनावणीत केला. पक्षाचे ९९ टक्के कार्यकर्ते यांच्या शरद पवार यांच्यासोबत असल्याचा दावा केल्याचं वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी सुनावणीनंतर वार्ताहरांना सांगितलं. काही चुकीची, बनावट आणि अपुरी कागदपत्रं सादर करुन पक्षात वाद असल्याचा दावा अजित पवार गटानं केला आहे. पक्षाची घटना त्यांना पाळायची नाही, आमदार आणि खासदारांच्या समर्थनाच्या आधारावर पक्षाचं नाव आणि निवडणूक चिन्हावर केलेला दावा शिवसेनेच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयानं मान्य केलेला नसल्याचं सिंघवी यांनी आयोगाला सांगितलं. अजित पवार गटासोबत असलेल्या आमदार-खासदारांना मिळालेली मतं ग्राह्य धरुन निर्णय द्यावा हा दावा आश्चर्यकारक असल्याचं सिंघवी म्हणाले. याप्रकरणी पुढची सुनावणी सोमवारी होणार असून यावेळी अजित पवार गटाचं म्हणणं ऐकून घेतलं जाईल. आयोगासमोर आज झालेल्या सुनावणीत शरद पवार यांनी अध्यक्ष या नात्याने पक्ष चालवताना कधीच लोकशाही मूल्यांचे पालन केले नाही. एखाद्या हुकुमशहा सारखा पक्ष चालवला, असा दावा अजित पवार गटानं केला.

**<><><><>**

काही प्रकारचे पर्सनल लोन अर्थात व्यक्तीगत कर्जांमध्ये मोठ्या प्रमाणात होत असलेल्या वाढीवर रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी चिंता व्यक्त केली आहे. या प्रकारांवर रिझर्व्ह बँकेचं लक्ष असून बँका आणि वित्तीय संस्थांनीही अंतर्गत निरीक्षण प्रणाली बळकट करण्याचे निर्देश बँकेनं दिलेत. भारतीय रिझर्व बँकेनं वित्त आणि पत धोरणाचा द्वैमासिक आढावा आज प्रसिद्ध केला. या आढाव्यात व्याजदरातही बदल झालेला नाही.

रिझर्व्ह बँकेनं पीएम विश्वकर्मा योजनेचा समावेश पेमेंट्स इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट फंड योजनेंतर्गत केला आहे. या योजनेला ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढ द्यायचा निर्णयही बँकेनं घेतला आहे.

**<><><><><>**

मुंबईत गोरेगाव इथं उन्नत नगर परिसरात पहाटे एका इमारतीला आग लागून झालेल्या दुर्घटनेत ७ जणांचा मृत्यू झाला तर ५१ जण जखमी झाले. त्यातल्या पाच जणांची प्रकृती चिंताजनक आहे. पहिल्या मजल्यावर अडकलेल्या ३० रहिवाशांना सुखरुप बाहेर काढण्यात आलं आहे.

मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी पाच लाख रुपये मदत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केली असून जखमींच्या उपचारांचा खर्चही राज्य सरकार करणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ही दुर्घटनेबद्दल तीव्र शोक प्रकट केला आहे. केंद्रसरकार मृतांच्या कुटुंबांना दोन लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये अर्थसहाय्य करणार आहे.

**<><><><><>**

सरकारी रुग्णालयांमध्ये डॉक्टर आणि सहायक कर्मचाऱ्यांची कोणतीही पदं रिक्त राहता कामा नये, असे सक्त निर्देश मुंबई उच्च न्यायालयानं राज्य सरकारला दिले आहेत. दोन सरकारी रुग्णालयांमध्ये नुकत्याच मोठ्या संख्येनं झालेल्या रुग्णांच्या मृत्यूंची स्वतःहून दखल घेत न्यायालयानं सरकारला नोटीस बजावल्यानंतर, याप्रकरणी आज मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती डी के उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठापुढं सुनावणी झाली. महाराष्ट्र वैद्यकीय साहित्य खरेदी प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची नियुक्ती दोन आठवड्यांच्या आत करण्याचे निर्देशही खंडपीठानं राज्याला दिले आहेत.

मृत्यू झालेल्या रुग्णांपैका बहुतांश रुग्ण अत्यंत गंभीर अवस्थेत या रुग्णालयांमध्ये दाखल झाले होते, या सरकारच्या उत्तरावर न्यायालयानं नाराजी व्यक्त केली.

<><><><><>

सिक्किममधे पूरबळींची संख्या २६ वर पोचली असून १४२ नागरिक बेपत्ता आहेत. सिक्कीम राज्य आपत्ती निवारण दलानं ही माहिती दिली. सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेमसिंग तमांग यांनी पुरात मरण पावलेल्यांच्या कुटुंबांना प्रत्येकी ४ लाख रुपये मदत जाहीर केली. या पुरातून आतापर्यंत २ हजार ४१३ नागरिकांना वाचवण्यात यश आलं आहे. एकूण १ हजार १७३ घरांना गंभीर हानी पोचली आहे. पूरग्रस्त भागात मदतकार्य सुरु असून  परराज्यातून सिक्किममधे रोजगारासाठी आलेल्यांना राज्यसरकार औषधं आणि वाहतूक मोफत पुरवत असल्याचं तमांग यांनी सांगितलं.

सिक्किममधे तिस्ता नदीला आलेल्या पुराचा फटका पश्चिमबंगालमधल्या कालिंपाँगलाही बसला आहे. पुराच्या पाण्यात किमान ३०० घरं वाहून गेल्याचं वृत्त आहे. बंगाल -  सिक्किम दरम्यानचा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १० दरडी कोसळल्यानं बंद पडला आहे. त्याच्या दुरुस्तीला अजून १० दिवस लागण्याची शक्यता आहे.

<><><><><>

सिरीयात सैन्य महाविद्यालयावर आज सकाळी झालेल्या ड्रोन हल्ल्यात १०० जण मृत्युमुखी पडले. होम्स शहरातल्या सैन्य महाविद्यालयाच्या पदवीदान समारंभावेळी हा हल्ला झाला. मृतांमध्ये सहा मुलांसह स्थानिक नागरिक आणि सैनिकांचा समावेश आहे, अशी माहिती आरोग्य मंत्री हसन अल घाबश यांनी दिली.

मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. या हल्ल्याची जबाबदारी अद्याप कुणीही घेतलेली नाही. संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अँटोनिओ गुटेरस यांनी या हल्ल्याबाबत शोक व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

ब्रिटीश नौदलानं अटक केलेल्या ३२ भारतीय मच्छीमारांची सुटका करावी अशी मागणी द्रमुक खासदार वायको यांनी केंद्र तसंच राज्य शासनाकडे केली आहे. या मच्छीमारांना २७ सप्टेंबरला अटक करण्यात आली होती. नागपट्टीनमचे हे मच्छीमार हिंदी महासागरात दूरवर मासेमारीसाठी गेले होते. तिथं दिएगो ग्रासिया बेटाच्या हद्दीत शिरल्यानं ब्रिटीश नौदलानं त्यांना अटक केली.

**<><><><><>**

महिलांच्या हक्कांसाठी लढा देणाऱ्या मानवाधिकार कार्यकर्त्या नर्गिस मोहम्मदी यांना यंदाचा नोबेल शांतता पुरस्कार जाहीर झाला आहे. नर्गिस मोहम्मदी इराणच्या नागरिक असून सध्या त्या तुरुंगवासात आहेत. तुरुंगवासाच्या काळात नोबेल पुरस्कारासाठी निवड झालेल्या त्या एकोणीसाव्या महिला कार्यकर्त्या आहेत. त्यांच्या आंदोलनांसाठी आतापर्यंत तेरा वेळा त्यांना अटक झाली, ५ वेळा न्यायालयाने त्यांना दोषी ठरवलं आणि एकूण ३१ वर्ष तुरुंगवासाची तसंच १५४ फटक्यांची शिक्षा त्यांना ठोठावण्यात आली आहे. इराणमधे महिलांवरच्या अत्याचाराविरोधात त्यांनी दिलेला लढा आणि एकूण मानवाधिकारांच्या रक्षणार्थ केलेलं कार्य याकरता त्यांची निवड नोबेल साठी झाल्याचं पुरस्कार समितीने म्हटलं आहे. १०लाख अमेरिकन डॉलर्स मूल्याचा हा पुरस्कार येत्या १० डिसेंबरला, आल्फ्रेड नोबेल यांच्या स्मृतीदिनी ओस्लो इथं प्रदान करण्यात येईल.

**<><><><><>**

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र – रात्री ८.०५ वाजता

६ ऑक्टोबर २०२३ – शुक्रवार

चीनमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतानं ऐतिहासिक कामगिरी करत आतापर्यंत 95 पदकं पटकावली आहेत. यात 22 सुवर्ण, 34 रौप्य आणि 39 कांस्य पदकांचा समावेश आहे. हॉकीच्या अंतिम सामन्यात आज भारताच्या पुरुष संघानं जपानचा 5-1 नं पराभव करत सुवर्ण पदक जिंकलं. कुस्तीमध्ये सोनम, किरन बिश्णोई, अमन यांनी विविध गटात कांस्य पदक जिंकलं. तिरंदाजीत भारतीय महिला खेळाडुंनी व्हिएतनामला 6-2 नं नमवत कांस्य पदक पटकावलं. बॅडमिंटनमध्ये एच एस प्रणॉयनं चीनच्या ली शी फेंगला 2-0 नं हरवत कांस्य पदक पटकावलं. बॅडमिंटनमधे सात्विकसाईराज रांकिरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनं अंतिम फेरीत धडक मारली आहे. अशी कामगिरी करणारी ही पहिलीच भारतीय जोडी आहे.

<><><><><>

एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज हैदराबाद इथं सुरु असलेल्या दुसऱ्या सामन्यात पाकिस्ताननं नेदरलँडपुढं विजयासाठी २८७ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

नेदरलँडनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. शेवटची बातमी हाती आली तेव्हा नेदरलँडच्या २९ व्या षटकात ५ बाद १३८ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//